# प्रेसनोट

दि.०४/०७/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | मंगेश विजय ढुमणे, वय–४१ वर्ष, महसुल सहायक, वर्ग–३, भूसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर रा.२६/१६१, गणेश चौक, सिव्हील हडको, अहमदनगर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ४,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी त्यांचे गावांमध्ये आईचे नावे घेतलेल्या जमिनीचे अकृषिक परवानगी करीता नाहरकत प्रमाणपत्र मिळणे करीता भूसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे प्रकरण दाखल केले होते. सदर नाहरकत प्रमाणपत्र दिले म्हणून यातील आरोपी लोकसेवक मंगेश विजय ढुमणे, वय–४१ वर्ष, महसुल सहायक, वर्ग–३, भूसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे रुपये ३,०००/– लाचेची मागणी केली होती. तसेच तक्रारदार यांचे निघोज गावातील मित्र यांचे सुध्दा अकृषिक परवानगी करीता नाहरकत प्रमाणपत्र मिळणे करीता प्रकरण दाखल केले होते, ते प्रमाणपत्र देणेकरीता आरोपी लोकसेवक ढुमणे यांनी रुपये १०००/– ची मागणी केली असले बाबतची तक्रार, तक्रारदार व त्यांचे मित्र यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयाकडे दिली. सदर दिलेल्या तक्रारीवरुन दि.०१/०७/२०२२ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक मंगेश विजय ढुमणे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे दोन्ही कामांचे एकत्रित मिळुन रुपये ४०००/– लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाले. आज दि.०४/०७/२०२२ रोजी आरोपी लोकसेवक ढुमणे यांचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजित केला असता तक्रारदार यांचेकडुन रुपये ४०००/– लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक मंगेश विजय ढुमणे यांनी पंचासमक्ष जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन विभागाचे समोरील मोकळया व्हरांडयात स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले आहे. सदर बाबत तोफखाना पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

.०४.०७

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर